आरआवलि ४३४.
दि.१६/७/२००९

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची ११२ वी बैठकीचा कार्यवृत्तांत.

---

बैठकीस खालीलपदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] मा. श्री. आ० कुंडलीकराव नागरे | सभापती औरंगाबाद मंडळ. |
| २] मा. श्री. आर. एन. शिनगारे | ~~मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ.~~ उप सभापती व मुख्य अधिकारी |
| ३] मा. श्री. ⟶ पाठक उपसंचालक औरंगाबाद विभाग | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ४] मा. श्री. विश्वास उपासे | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ५] मा. श्री. डी. डी. शिंदे कन्नड | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ६] मा. श्रीमती शैलजा दत्तात्रय गायकवाड | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ७] मा. ॲड जे. पी. पाटील | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| ८] मा. श्री. संजय वाघचौरे | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ९] मा. श्री. साहेबराव खरात | सदस्य औरंगाबाद मंडळ |
| १०] मा. श्री. मकरंद सावे | सदस्य औरंगाबाद मंडळ. |
| ११] मा. श्री. राजेश्वर चव्हाण | सदस्य औरंगाबाद. मंडळ |
| १२] मा. श्री. वामनराव राऊत | सदस्य औरंगाबाद मंडळ. |

मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी नवनियुक्त सर्व सन्माननीय सदस्यांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत केले. तदनंतर मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी मा. मुख्याधिकारी यांना सांगितले की, नवनियुक्त सन्माननीय सदस्यांची ही पहिलीच बैठक असल्या कारणाने मंडळाच्या कामकाजाविषयी माहिती द्यावी. त्यानुसार मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळाच्या कामकाजाविषयी माहिती दिली.

विषय क्र: २:- औमं. च्या कामकाजाविषयी माहिती.

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाकडे उपलब्ध असलेल्या जमिनीवर मागणीनुसार गृहनिर्माण योजना राबविल्या जातात. परंतु सध्या राष्ट्रीय गृहनिर्माण योजना, लोक आवास योजना विशेषत: ~~योजना~~ राबविण्यात येत आहे. त्या संदर्भात मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी खालील प्रमाणे विस्तृत माहिती दिली.

## राष्ट्रीय गृहनिर्माण योजना.

केंद्र शासनाने, महाराष्ट्र शासनास राज्यात अत्यल्प व अल्प उत्पन्न गटाकरिता ७७४२० सदनिका बांधण्याचे उदि्दष्ट दिले आहे. राज्य शासनाने सदर सदनिका म्हाडातर्फे बांधण्याचे निर्देश दिले आहे. प्राधिकरणाने ७७४२० सदनिकापैकी १५४८५ सदनिका बांधण्याचे उदि्दष्टे औरंगाबाद मंडळास दिले आहे. सदरहू १५४८५ सदनिका तीन टप्प्यात बांधण्यात येणार आहे.

टप्पा क्र. १: टप्पा क्र. १ अंतर्गत औरंगाबाद मंडळास एकुण ३०४८ गाळे बांधण्याचे इष्टांक होता, औरंगाबाद मंडळाने मार्च २००१ अखेर अत्यल्प व अल्प उत्पन्न गटाकरिता २३७३ गाळे व मध्यम उत्पन्न गटा अंतर्गत ~~x१~~ २५८ गाळे असे एकुण २६३१ गाळयाचे इष्टांक पुर्ण केला आहे असे मा. मुख्याधिकारी यांनी मंडळास सांगितले.

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी राष्ट्रीय गृहनिर्माण योजनेच्या टप्पा क्र. २ व टप्पा क्र. ३ बाबत मंडळास माहिती दिली की,

टप्पा क्र. २: देवळाई १३०० गाळे, भोकरदन २६७ गाळे परळी १२८, जालना ३९० गाळे असे एकूण २०८५ गाळे तसेच xxxx साखर कारखान्यासाठी अस्थायी ऊसतोड कामगारांसाठी तीस साखर कारखान्यापैकी १० कारखान्याकरिता प्रत्येकी, १०० या प्रमाणे १००० गाळे, असे एकुंदर ३०८५ गाळ्यांचा इष्टांक दुसऱ्या टप्प्यासाठी असल्याचे मा. मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले.

टप्पा क्र. ३: टप्पा क्र. ३ अंतर्गत मंडळाने उर्वरीत २० साखर कारखान्यात प्रत्येकी १०० या प्रमाणे २००० गाळे व प्रत्येक तालुक्यात किमान १०० गाळे या प्रमाणे ४० तालुक्यात ४००० गाळे बांधण्याचे प्रस्तावीत आहे. त्यासाठी जमिन संपादनाचे प्रस्ताव संबंधीत उपअभियंता यांचेकडून मागविण्यांत आले आहे व ते या महिन्याखेर प्राप्त होण्याचे अपेक्षीत असल्याचे मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले.

या व्यतिरिक्त विशिष्ट गटासाठी विविध ठिकाणी ३०००गाळे बांधण्याचे प्रस्तावीत आहे. याप्रमाणे तिसऱ्या टप्प्यात ९००० गाळे बांधण्याचे प्रस्तावीत आहे असे मा. मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले.

लोक आवास योजना
---------------

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी लोक आवास योजनेबाबत माहिती दिली.

दि. १.१.९५ च्या मतदार यादीत नांव असलेल्या व शासन घोषित झोपडपट्ट्या मध्ये वास्तव्य करीत असलेल्या झोपडपट्टीधारक या योजनेस सहभागी होण्यास पात्र असल्याचे मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले.

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी लोक आवास योजनेअंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीबाबत माहिती दिली.

मागासवर्गीयासाठी
--------------

| | |
|---|---|
| १. एनएसडीपी अंतर्गत अनुदान | रु. ११०००/- |
| २. विशेष घटक योजने अंतर्गत अनुदान | रु. ९०००/- |
| ३. वित्तीय संस्थेचे कर्ज | रु. ५०००/- |
| ४. लाभधारकांचा स्वत:चा निधी | रु. ५०००/- |
| एकुण | रु. ३०,०००/- |

अमागसवर्गीयासाठी
---------------

| | |
|---|---|
| १. एनएसडीपी अंतर्गत अनुदान | रु. १०,०००/- |
| २. वित्तीय संस्थाचे कर्ज | रु. १५,०००/- |
| ३. लाभधारकांची निधी | रु. ५,०००/- |
| एकुण | रु. ३०,०००/- |

प्रस्तावीत योजनेसाठी बाह्य सुविधा जसे, पाणी, वीज, रस्ते मलनि:सारण स्थानिक प्रशासनाने विनामुल्य पुरवावयाच्या आहेत असे मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले.

या योजनेतील घरकुलांचे बांधकाम लाभार्थीनी स्वत: करणे अपेक्षीत आहे किंवा जिल्हा गृहनिर्माण समिती याबाबत जे निर्णय घेईल त्याप्रमाणे बांधकाम करावयाचे अपेक्षीत आहे. या योजनेतील लाभधारकांची निवड ही जिल्हा गृहनिर्माण समितीने अंतिम करावयाची आहे. तसेच या योजनेसाठी लागणा-या जमिनीची निवड योजनेस प्रशासकीय मान्यता देणे इ. कार्यवाही, अध्यक्ष जिल्हा गृहनिर्माण समितीने करावयाची आहे.

कुटूंबातील स्त्रियांचे नांवे सदरचे घरकुल करण्याचे शासनाचे आदेश आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. असे मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले.

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी, मराठवाड्यातील सहकारी साखर कारखान्याच्या ऊसतोड कामगारांसाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठीची रु. ३५०००/- या कमी किंमतीची घरबांधणी योजनेबाबत मंडळास माहिती दिली.

मा. मुख्याधिकारी औ. मं. यांनी अस्थायी/ऊसतोड कामगारांसाठी राबवावयाच्या गृहनिर्माण योजनेबाबत माहिती देतांना विषद केले की, सहकारी साखर कारखान्यांच्या गळीत हंगामाच्या वेळी सहकारी साखर कारखान्यांना त्यांचे अस्थायी/ऊसतोड कामगारांसाठी दरवर्षी तात्पुरत्या (बांबू, तट्ट्याची) ~~स्वरुपाची~~ घरे बांधुन व्यवस्था करावी लागते. गळीत हंगाम संपल्यानंतर हे कामगार निघुन जातात. ~~दरवर्षी अशा तात्पुरत्या स्वरुपाची (बांबु तट्टया पालापाचोळ्याचे) घरे बांधुन व्यवस्था करावी लागते.~~ त्यामुळे साखर कारखान्यांना दरवर्षी अशी घरे बांधणीसाठी खर्च करावा लागतो.

सहकारी साखर कारखान्यांच्या अशा अस्थायी कामगारांसाठी अत्यल्प उत्पन्न गटाची योजना हाती घेता येऊ शकते. तसेच कारखान्याच्या स्थायी स्वरुपी काम करणा-या कर्मचा-यांसाठी अल्प उत्पन्न गटातील घरबांधणी योजना हाती घेता येऊ शकते.

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी माहिती दिली की, अस्थायी ऊसतोड ~~अत्यल्प उत्पन्न गटातील~~ कामगारांकरिता योजना हाती घेतल्याने कारखान्यांचा दरवर्षी होणारा खर्च वाचेल. यासाठी कारखान्याने फक्त खालील बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. ~~असे मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले.~~

१. या योजनेसाठी लागणारी जमिन कारखान्याने विनामुल्य उपलब्ध करुन म्हाडास द्यावी. सदरची जमिन बोजा विरहीत असावी.

२. या योजनेसाठी लागणा-या बाहय सुविधा जसे रस्ते, पाणीपुरवठा मलनि:सारण व वीज कारखान्याने विनामुल्य पुरवाव्यात.

३. कर्ज परतफेडीची हमी साखर कारखान्याने द्यावी. म्हणजे कर्जाचा मासिक हप्ता, कारखान्याने वसुल करुन म्हाडाकडे भरावा. साखर कारखान्याच्या कर्मचा-या करिता हाती घेण्यात येणा-या योजनांसाठी लागणारे कर्ज हे हडको किंवा राष्ट्रीय गृहनिर्माण बँक या वित्तीय संस्थांकडून घ्यावयाचे प्रस्तावीत आहे. यासाठी शासनाची कर्जासाठी हमी आवश्यक आहे. सहकारी साखर कारखान्यासाठी घेण्यात येणा-या योजनांसाठी शासनाने विनाशुल्क शासकीय हमी द्यावी.

मा. मु. अ/औ. मं. यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, ही योजना हाती घेतल्याने सहकारी साखर कारखान्यासाठी स्थायी स्वरुपाची मालमत्ता होते. त्यामुळे कारखान्याने ही योजना स्वत: करिता हाती घ्यावयाची आहे.

मराठवाड्यात सध्या साधारणत: ३२ सहकारी साखर कारखाने चालु स्थितीत आहे. प्रथम टप्प्यात १० कारखान्यासाठी १०० आर्थिक दुष्टया दुर्बल घटकांसाठी घरकुले असे एकुण १००० घरकुलाची विशेष गृहनिर्माण योजना राष्ट्रीय कार्यक्रमान्तर्गत हाती घेण्याचे प्रस्तावित असल्याचे मा. मु. अ. यांनी सांगितले.

तालुकास्तर/ग्रामीण भागात गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.

मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी नवनियुक्त मंडळास माहिती दिली की, मंडळाचे सभापती मा. नागरे साहेब यांचा म्हाडातर्फे राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या योजना ग्रामीण भागातही राबवाव्यात असा आग्रह होता त्यासाठी ते सतत शासन/प्राधिकरणाकडे पाठपुरावा करीत आहेत. त्यामुळे मा. उपाध्यक्ष यांनी प्रायोगिक तत्वावर दोन गांवाना मंजूरी दिली. मा. सभापती यांचे मार्गदर्शनाखाली उक्त योजना ग्रामीण भागात राबविण्याच्या दृष्टीने प्रस्ताव म्हाडास सादर करण्यांत आला.

म्हाडाने प्रथमत: सावळी व बोरी ता. जिंतूर जि. परभणी या दोन ठिकाणी प्रायोगिक तत्वावर योजना राबविण्यास मंजूरी दिली. या योजनेतील गाळ्यांच्या किंमतीच १० टक्के अनामत रकमेसह ठोस मागणी अजमाविण्यास्तव जाहिरात देण्यात आली. या जाहिरातीस अनुसरून १० टक्के अनामत रकमेसह सावळीयेथील योजनेसाठी २१ व बोरी येथील योजनेसाठी १२५ अर्ज प्राप्त झाल्याचे मा. मुख्याधिकारी यांनी मंडळास माहिती दिली.

तसेच मा. मुख्याधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी तालुकास्तरावरावर राबवावयाच्या योजनेबाबत ~~माहिती दिली.~~ खालील प्रमाणे माहिती दिली.

~~मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले की,~~ मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची एक बैठक मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी घेतली होती. त्या बैठकीत तालुकास्तरावरील व ग्रामीण भागात राबवावयाच्या गृहनिर्माण योजनेबाबत माहिती देण्यांत आली. व रु. ३५,०००/- किंमतीच्या घराबाबतची सदर बैठकीत माहिती देण्यांत आली. ~~आल्याचे मा. मुख्याधिकारी यांनी प्रतिपादन केले.~~

मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले की, कमी किंमतीच्या घरांची योजना राबविण्यासाठी तालुकास्तरावर/ग्रामीण भागात शासकीय जमिन नाममात्र दराने मिळाल्यास व बाह्यसुविधा या स्थानिक संस्थांनी, ग्रामपंचायत/नगरपालिका/ महानगरपालिका यांनी पुरविल्यास गाळ्यांच्या किंमत रु. ३५,००० पर्यन्त ठेवता येऊ शकतील. ~~असे~~

सदर बैठकीत ~~मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले की,~~ मा. विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकारी यांना सुचना दिल्या की, तालुकास्तरावर राबवावयाच्या गृहनिर्माण योजनेसाठी किमान दोन हेक्टर ~~ऐवढी~~ शासकीय जमिन म्हाडास उपलब्ध करून द्यावी.

मा. मुख्याधिकारी यांनी सांगितले की, जर शासकीय जमिन उपलब्ध न झाल्यास म्हाडा नियमांतर्गत जमिन संपादन करण्याबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

मा. मुख्याधिकारी यांनी मंडळाच्या कामकाजाविषयी माहिती दिल्यानंतर मा. सभापती औरंगाबाद मंडळ यांनी नवनियुक्त सदस्यांना सुचना ~~केलेल~~ केली की, त्यांनी आपले मनोगत व्यक्त करावे.

१) मा. सदस्य श्री. उपासे यांनी मा. सभापती व उपस्थित सन्माननीय सदस्य व मुख्य अधिकारी यांचे अभिनंदन केले व त्यांनी आपले विचार व्यक्त करतांना प्रतिपादन केले की, समान्य माणुस हा विकासाचा केंद्र बिंदु मानुन समाजातील गोरगरीबांसाठी घरे बांधण्याचा प्रयत्न करण्यांत यावा. तसेच मा. सभापती यांनी ग्रामीण भागात योजना राबविण्यासाठी प्रयत्न केले त्याबद्दल मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो, तसेच भटक्या जाती, विमुक्त जाती व पारधी समाजासाठी ग्रामीणभागात घरबांधणी योजना मंडळाने राबविण्याचा प्रयत्न करावे व ज्या ज्या ठिकाणीवैयक्तीक भूखंड आहेत त्यांचेसाठी घरे बांधण्याचा विचार मंडळाने करावा. ~~मा. सदस्य श्री. उपासे यांनी बोलतांना असे मत प्रगट केले की,~~ शासनाने माझी सदस्यपदी नियुक्ती करुन पाठविले त्याबद्दल मला आनंद वाटतो व मला काल्पनिक काम करण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करणे आवडेल.

२) मा. सदस्य ॲड. जे. बी. पाटील यांनी प्रतिपादन केले की, म्हाडातर्फे राबविण्यांत येणा-या योजना अत्यंत योग्य पध्दतीने समजावुन घेऊन म्हाडाची योजना पुर्ण जिल्ह्यामध्ये कशा पध्दतीने राबविता येतील, याचा विचार करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात घरांची नितांत गरज आहे व त्यामुळे जास्तीत जास्त घरे बांधण्याचा मंडळाने प्रयत्न करावा. तसेच श्री. पाटील, यांनी प्रतिपादन केले की, पुनर्वसनाची कामे म्हाडास करता येऊ शकतील काय याबाबतही विचार मंडळाने करावा.

यानंतर श्री. पाटील सदस्य यांनी लोक आवास योजने अंतर्गत कामे सुरु करावी व या अनुषंगाने करावयाची कारवाई व त्यासाठी मनपा/नांदेड जिल्हाधिकारी नांदेड यांचे लागणारे आवश्यक ते सहकार्य मिळविण्यासाठी मी प्रयत्न ~~करतील~~ (करण्यात), परंतु त्यासाठी निधी कमी पडता कामा नये. या अनुषंगाने मुख्याधिकारी औ. मं. यांनी सांगितले की, घोषीत झोपडपट्टयामध्ये लोक आवास योजना अंतर्गत कामासाठी निधी कमी पडणार नाही. ही योजना राबविण्यास्तव प्रथमत: मनपा नांदेड यांनी व जिल्हा गृहनिर्माण समिती नांदेड यांनी लाभधारकाची निवड करुन जिल्हा गृहनिर्माण समितीने या कामी पुढाकार घेणे आवश्यक आहे. यासाठी सध्यातरी निधी कमी पडणार नाही. ~~असे मुख्याधिकारी यांनी सांगितले.~~

तसेच श्री. पाटील यांनी असेहीप्रतिपादन केले की, पुरग्रस्तांसाठी जमिनीची उपलब्धझाल्यास तेथेही मंडळ घरे बांधु शकते काय याचाही विचार मंडळाने करावा.

मा. मुख्याधिकारी औ. मं. यांनी सांगितले की, नांदेड येथे जमिन उपलब्ध झाल्यास व मागणी असल्यास गृहनिर्माण योजना राबविण्यांत येतील.

३) सन्माननीय सदस्या श्रीमती गायकवाड यांनी प्रतिपादन केले की, शासन घोषित झोपडपट्टयामध्ये लोक आवास योजने अंतर्गत झोपडपट्टी धारकास घरे बांधुन देण्यांत येत आहेत. त्याप्रमाणे ग्रामीण भागातील गरीब व्यक्तींसाठी त्यांच्या स्वत:च्या जागेवर अशा प्रकारचे घरे बांधुन देता येतील काय याचा विचार मंडळाने करावा. परभणी शहरात आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठी [illegible] घरे बांधण्यासाठी मंडळाने प्रयत्न करावा व त्यासाठी जमिन देण्याचा प्रयत्न केला जाईल. ~~असे श्रीमती गायकवाड सदस्य औ. मं. यांनी सांगितले.~~

४) मा. श्री. चव्हाण, सदस्य, यांनी प्रतिपादन केले की, ~~आपण शेतकरी कुटूंबातुन आली असल्यामुळे व~~ वाढती लोकसंख्या, राहण्याच्या ~~गरजा~~ जागेचा/घरांचा तुटवडा, आबादी व गोरगरीब, गरजेच्या लोकं देण्यासाठी ~~पंचिमासाठी~~ शासन प्रयत्न करीत आहे व त्यासाठी आपल्या मंडळातर्फे घरे बांधणीचा विचार करावा. श्री. चव्हाण यांनी असेही प्रतिपादन केले की, ज्याठिकाणी १०,००० लोकसंख्येची गांवे आहेत अशा ठिकाणी घरे बांधणी/शॉपींग कॉम्पलेक्स योजना राबविण्यात याव्यात. ~~श्री. चव्हाण यांनी बोलतांना असे प्रतिपादन केले की,~~ मा. सभापती यांनी म्हाडाच्या योजना ग्रामीण भागात खेचुन आणल्या त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो.

५) सन्माननीय सदस्य श्री. ~~मकरंद~~ मकरंद सावे, यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना प्रतिपादन केले की, मंडळातर्फे राबविण्यांत येणा-या योजनांबाबतची माहिती छोटया बुकलेटमध्ये सन्माननीय सदस्यांना देण्यांत यावी.

तसेच झो. प. सु. कार्यक्रमा अंतर्गत गटारे, रस्ते इ. कामे म्हाडातर्फे करता येतील काय असे त्यांनी विचारले व यावर मा. मु. अ. यांनी सांगितले की झो. प. सु. योजने अंतर्गतची कामे स्थानिक न. प. /मनपा यांचे मार्फत राबविल्या जातात व त्यांनी केलेल्या कामाची तपासणी मंडळाचे उपअभियंता यांचे कडून केली जाते व तदनंतरच देयके अदायगी करण्यांत येते.

श्री. सावे यांनी असे सांगितले की, झोपडपट्टी सुधार योजने अंतर्गत कामाचा दर्जा व गुणवत्ता चांगल्या प्रकारे राहावी यासाठी ही कामे म्हाडातर्फे करण्यांत यावी. यावर मा. सभापती महोदयांनी सुचीत केले की, या प्रकरणी कायदेशीर बाबी तपासुन पाहुन मंडळाच्या वतीने शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. तसेच मा. सभापती यांनी असे ही सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी झो. प. सु. चे अंतर्गत कामावर उपअभियंता समवेत भेटी द्याव्यात व कामे बरोबर चालले आहेत का नाही याबाबत पहाणी करावी. ~~व कामे बरोबर होत नसतील तर त्याबाबतीत सदस्यांनी तक्रार करावी.~~ व कामे बरोबर असल्यास तसे प्रमाणपत्र द्यावे, तद्नंतरच प्रतिपुर्ती करण्यात येईल.

६) मा. श्री. साहेबरावजी खरात सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, जालना जिल्ह्यात गृहनिर्माण योजना जास्तीत जास्त प्रमाणात राबविणे आवश्यक आहे. तसेच जालना येथील मंडळाचे उपविभागीय कार्यालय कार्यक्षम करण्यात यावे व उपअभियंता यांनी मंडळाचे सदस्यांशी नेहमी संपर्क ठेवावा. तसेच जालना येथील उपविभागीय कार्यालयात कायम स्वरुपी कर्मचारी ठेवण्यात यावा. गोरगरीबांसाठी जास्तीत जास्त घरे मराठवाड्यात बांधण्यात यावी व योजनांचे स्वरुप हे फक्त शहरी भागातच मर्यादीत न ठेवता ग्रामीण भागातील गरीब जनतेसाठी, पुनर्वसीत लोकांसाठी म्हाडाने योजना राबविण्याचा प्रयत्न करावा.

श्री. खरात, सदस्य औ. मं. यांनी बोलतांना असे प्रतिपादन केले की, म्हाडाने शहरी भागातील लोकांसाठी मर्यादीत न राहता समाजातील दुर्बल, गोरगरीबांसाठी योजना राबवल्यात व सामान्य जनतेमध्ये "म्हाडाची प्रतिमा" चांगली निर्माण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्री. खरात सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, मी राळेगणसिध्दी येथे जावुन तेथील कामाची पहाणी केली व तेथील विकासाची कामे चांगल्या प्रकारे असल्याचे दिसुन आले. तेथील नाल्यांची/सांडपाण्याची व्यवस्था व्यवस्थीत केलेली आहे व रस्त्यावर कोठेही सांडपाणी दिसत नाही. त्यांनी परिसर रोगराई मुक्त केले आहे. म्हाडाच्या वसाहतीत असाच प्रकारचे काम करता येऊ शकेल व यास्तव मंडळाच्या वसाहतीत उघड्या नाल्या असु नये व यासाठी मंडळाचे अधिकारी व मा. सदस्य यांचा एक दौरा आयोजित करावा व तेथील पहाणी करावी. तसेच जेथे नविन तालुके झालेले आहेत. त्याठिकाणी व ग्रामीण भागात योजना देण्यात याव्यात व मंडळाच्या सदस्यांना ओळखपत्र देण्यात यावे. श्री. खरात यांनी असेही सांगितले की, मंडळाचे सर्व सदस्यांना विश्वासात व त्यांचे सहकार्य घेऊन मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कामे करावीत.

७) मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. डॉ. डी. डी. शिंदे यांनी असे प्रतिपादन केले की, २५, २६ वर्षापासून म्हाडा हा मुंबई व पुण्याचा भाग आहे अशी लोकांची धारणा आहे तसे न राहता प्रामुख्याने ग्रामीण भागात म्हाडाची योजना आणण्याचे औरंगाबाद मंडळातर्फे प्रयत्न होत आहेत. याबद्दल मी सभापती व मंडळाचे अधिकारी यांचे अभिनंदन करतो. मा. मु. अ. यांनी साखर कारखान्यातील अस्थायी कर्मचारी व ऊसतोड कामगार यांचेसाठी एक अभिनव अशी योजना तयार केलेली आहे. त्या योजनेस चांगला प्रतिसाद मिळेल. सदर योजना अतिशय सुंदर असुन सर्वांनी प्रयत्न केल्यास ही योजना यशस्वी होईल असे मत व्यक्त केले.

डॉ. शिंदे सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, आजही गरीबांसाठी निवाऱ्याची नितांत आवश्यकता आहे व त्यासाठी सर्वकष प्रयत्न होणे. होणे आवश्यक आहे आजही बरेच लोक निवाऱ्यापासून वंचीत आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. शिंदे यांनी प्रतिपादन केले की, नुकतेच मी मंडळाचे मु. अ. यांचे समवेत कन्नड येथे साखर कारखान्यासाठीच्या योजनेसंबंधी भेट दिली व त्यांना मंडळाने तयार केलेल्या योजनेची संपूर्ण माहिती दिली व योजना समजावुन सांगितली. कारखान्यास सदर योजना पटली असुन ती योजना त्यांच्या ऊसतोड कामगारांसाठी राबविण्यास ते तयार झाले आहेत. तसेच कारखान्यामधील इतर कामगारांसाठीही योजना राबविता येऊ शकेल अशी कल्पना त्यांना दिली आहे. कारखान्याकडे असलेली जमिन गृहनिर्माण योजनेसाठी मंडळाला मिळेल.

डॉ. शिंदे सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, ऊसउत्पादक शेतकऱ्यांसाठी जर साखर कारखान्याने हमी घेतल्यास साखर कारखान्याच्या परिसरात त्यांचेसाठी गृहनिर्माण योजना मंडळामार्फत राबविता येऊ शकेल. तसेच दारिद्र्य रेषेखालील बेघर लोकांना घरे बांधण्यासाठी जि. ग्रा. विकास यंत्रणेमार्फत [डीआरडीए] तर्फे रु. १०,०००/- अनुदान मिळते म्हणून अशा लोकांसाठी योजना राबविता येऊ शकेल त्यांचाही मंडळाने अभ्यास करावा व या अनुषंगाने प्रकल्प संचालक यांची मी भेट घेणार आहे. असे डॉ. शिंदे यांनी सांगितले.

डॉ. शिंदे सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, प्रत्येक सदस्यांनी त्यांचे जिल्ह्यात पुनर्वसनाच्या गावाची माहिती द्यावी व त्या ठिकाणी पुनर्वसीत लोकांसाठी गृहनिर्माण योजना घेता येईल काय याबाबतही विचार करावा. तसेच डॉ. शिंदे सदस्य औ. मं. यांनी सांगितले की, मंडळाचे इतर कार्यालयाकडे असलेली कामे करुन घेण्यासाठी मंडळाचे सन्माननीय सदस्यांनी गरज भासल्यास त्यासाठी आम्ही सहकार्य करण्यास तयार आहोत.

८] मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. राऊत यांनी प्रतिपादन केले की, गोरगरीबांसाठी मंडळाने जास्तीत जास्त योजना राबवाव्यात. तसेच जालना विडी कामगार योजनेतील गाळ्यांना विज, रस्ते व पाणी इ. सुविधा पुरविण्यात याव्यात. xxxxxx

९] श्री. पाठक, उपसंचालक नगररचना व सदस्य औ. मं. यांनी असे प्रतिपादन केले की, सध्या महाराष्ट्रातील इतर विभागापेक्षा मराठवाड्यात घरांची अत्यंत आवश्यकता आहे. म्हाडाच्या योजना ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेपर्यन्त नेण्याचा प्रयत्न मा. सभापती औ. मं. हे प्रयत्न करीत आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मानवाची मुलभूत तीन गरजांपैकी निवारा ही मुलभूत गरज आहे. निवाऱ्याच्या स्वप्नपुर्तीसाठी प्रत्येकस्तरावरील माणुस हा आकांक्षा बाळगुन आहे. समाजातील गोरगरीब, दुर्बल व्यक्तीसाठी

ग्रामीण भागात योजना राबवाव्यात. श्री. पाठक सदस्य औ.मं. यांनी प्रतिपादन केले की, ज्याप्रमाणे शहरातील मध्यम व उच्च उत्पन्न गट योजनावरील नफाहा अल्प व अत्यल्प उत्पन्न गट योजनावर क्रॉस सबसिडी द्वारे वर्ग करुन घरांची किंमत कमी करण्यांत येते त्याचप्रमाणे शहरी भागात गृहनिर्माण योजना राबवुन त्याद्वारे मिळणारा नफा ग्रामीण भागातील गृहनिर्माण योजनेतील गाळ्यावर क्रॉस सबसिडीद्वारे वर्ग करुन गाळ्यांची, ग्रामीण भागात किंमतीत मर्यादीत ठेवण्याचा मंडळाने प्रयत्न करावा.

श्री. पाठक सदस्य औ.मं. तथा उपसंचालकनगररचना यांनी प्रतिपादन केले की, नविन विकसित तंत्र वापरुन तयार करण्यांत आलेले बांधकाम साहित्य वापरुनही गाळ्यांच्या किंमती कमी ठेवता येऊ शकतील. अलिकडच्या काळात भूकंपचा तीव्र झटका येऊन गेला. त्यामुळे बरेच नुकसान झालेले आहे. मंडळातर्फे नविन विकसीत झालेल्या टेक्नोकलपध्दतीनेभूकंपरोधक बांधकाम करण्याचाही मंडळाने विचार करणे आवश्यक आहे. तसेच म्हाडच्या गाळ्यांच्या बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता उंचावण्यासाठी मंडळानी सर्वतोपरी उपाययोजना करुन प्रयत्न करावे.

श्री. पाठक सदस्य औ.मं. ~~तथा उपसंचालकनगररचना~~ यांनी प्रतिपादन केले की, आजच्या परिस्थितीमध्ये घर मिळणे अत्यंत कठीण झालेले आहे. त्यासाठी मंडळाने गृहनिर्माण योजना मोठ्या प्रमाणात राबवुन गोरगरीब जनतेच्या निवाऱ्याची समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा व त्यासाठी मंडळातर्फे सर्वतोपरी सहकार्य करण्यांत येईल.

श्री. पाठक सदस्य औ.मं. यांनी सांगितले की, मी ~~सदस्य~~ वास्तुशास्त्रज्ञ म्हणून माझी भूमिका मी मंडळासमोर मांडली आहे. त्याचा विचार व्हावा अशी विनंती आहे. श्री. पाठक यांनी बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल आभार ~~व्यक्त केले~~ मानतो.

सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांचे विचार मांडल्यानंतर मा. सभापती औ.मं. यांनी सर्व मुद्यांचा उहापोह करुन असे प्रतिपादन केले की, सर्व सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सुचना केलेल्या आहेत व त्याचा विचार करणे आवश्यक आहे. आपल्या देशातील ८०% जनता ही खेडयात/ग्रामीण भागात राहते, त्यास केंद्रबिंदु मानुन विकासाचाची कामे/गृहनिर्माण योजना राबविल्यास तर खऱ्या अर्थाने त्यांचे श्रेय मा. ~~मुख्यमंत्री~~ ना. श्री. विलासरावजी देशमुख साहेब, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे सरकारला मिळेल. तसेच श्री. उपासे यांनी आपल्या विचारात मांडलेल्या भटक्या, विमुक्त व पारधी समाजाच्या लोकांसाठी घरबांधणी योजना राबविण्यासाठी जे प्रतिपादन केले ते स्तुत्य असुन त्याचा विचार येथे करणे आवश्यक आहे व हे काम सर्वांच्या सहकार्यानेच शक्य आहे. मंडळाचे नवनियुक्त सदस्यांनी पोट-तिडकीने ग्रामीण/ गोर-गरीबांसाठी, पुनर्वसीत गावातील लोकांसाठी, मजुर वर्गासाठी,

तसेच लोक आवास योजनेप्रमाणे ग्रामीण भागातील गरीब व्यक्तीच्या तो जेथे राहत आहे त्या भूखंडावर घर बांधून देण्याबाबतचा किंवा विशिष्ट प्रवर्गातील लोकांसाठी, साखर कारखान्यातील अस्थायी/कर्मचारी, ऊसतोड कामगार, ऊसउत्पादक शेतकरी, ज्या ठिकाणी १० हजार लोकवस्तीची गावे आहेत त्या ठिकाणी गृहनिर्माण योजना राबविण्यासाठी जे विचार मांडले त्याचा या ठिकाणी विचार करणे आवश्यक आहे व यासाठी मला सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याची आवश्यकता आहे व आपण सर्वांनी मिळुन हे काम केल्यास कामात कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही/~~असे मा. सभापती यांनी सांगितले,~~

मा. सभापती यांनी प्रतिपादन केले की, मी सर्व प्रथम ग्रामीण भागात योजना कार्यान्वीत व्हावी म्हणून प्राधिकरण व शासन स्तरावर प्रयत्न करुन जिंतुर तालुक्यातील बोरी व सावळी या ठिकाणी अत्यल्प/अल्प उत्पन्न गटाची योजना राबविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले व सदर ठिकाणी मागणी प्राप्त होत असल्यामुळे सदर योजना लवकरच कार्यान्वीत होईल. मी सर्व नवनियुक्त सदस्यांना सुचवू इच्छीतो की, त्यांनीही आपआपल्या भागात कोठे योजना घ्यावी याचा विचार करुन मंडळाकडे तसे प्रस्ताव द्यावे म्हणजे त्या त्या भागातील सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या ठिकाणी योजना कार्यान्वीत करण्यासाठी मंडळाच्या स्तरावरुन योग्य ती कारवाई करणे शक्य होईल.

मा. सभापती/औ.मं. ~~सचिव साहेब~~ यांनी सन्माननीय सदस्यांना सुचविले की, शासकीय जमिन उपलब्ध असल्यास गृहनिर्माण योजना त्वरीत राबविणे शक्य होईल. त्यादृष्टीने आपल्या भागात कुठेकुठे शासकीय जमिनी उपलब्ध आहेत त्याचा शोध घ्यावा व मंडळ कार्यालयास त्याची माहिती पाठवावी. जर शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास म्हाड कायदा अंतर्गत कलम ५२ खाली गृहनिर्माण योजनेस योग्य असलेली खाजगी जमिन घेण्याचा विचार मंडळ करेल. मा. सभापती महोदयांनी प्रतिपादन केले की, ग्रामीण भागात जर २५ ते ५० पर्यन्त घरांची मागणी प्राप्त झाली तर तेथे गृहनिर्माण योजना हाती घेण्याचा ~~बांधण्याचा~~ मंडळ विचार करेल.

मा. सभापती महोदयांनी असेही सुचित केले की, ~~बैठकीच्या ओघात स्पष्ट केले की,~~ मंडळाच्या सर्व अधिकाऱ्यांनी मंडळाच्या सर्व सदस्यांना सन्मानाची वागणुक द्यावी व सन्माननीय सदस्यांच्या अडीअडचणी समजुन घ्याव्यात व त्यांचेशी अधिकाऱ्यांनी संपर्कात राहावे जेणे करुन मंडळाच्या कामात गतीमानता येईल.

सन्माननीय सदस्य मा. श्री. संजय वाघचौरे यांनी अशी विचारणा केली की, पैठण येथे ज्या जमिनीवर पुरग्रस्तांसाठी योजना प्रस्तावीत होती. त्याबाबत काय झाले. यावर मुख्याधिकारी यांनी खुलासा केला की, सदर जमिन ही म्हाडास पुरग्रस्तांच्या योजनेसाठी मिळाली होती व सध्या पुरग्रस्तांसाठीची योजना राबवावयाची नसल्यामुळे, या जमिनीवर म्हाडाची सर्वसामान्य जनतेसाठी योजना घ्यावयाची असल्यास, जिल्हाधिकारी यांचेकडून जमिनीच्या वापरात बदल करुन घ्यावा लागेल. मान्यता मिळाल्यास गृहनिर्माण योजना राबविता येईल.

मुख्याधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती केली की, मंडळाच्या कामकाजाविषयी मा. सदस्यांच्या काही सुचना/प्रश्न असल्यास मंडळाच्या बैठकीपुर्वी १५ दिवस अगोदर कळविल्यास त्यावर मंडळाच्या अधिकाऱ्यांना कारवाई करणे शक्य होईल.

नवनियुक्त मंडळाने मंडळाच्या कामकाजाची नोंदघेऊन खालील प्रमाणे निर्णय घेतले.

ठराव क्र. ६७९ ६७८

मंडळाच्या कार्यक्षेत्रातील, भटक्या/विमुक्तजाती, पारधी समाजातील लोकांसाठी, ग्रामीण भागातील मजुरांसाठी व गोरगरीब, दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी, ऊसतोड कामगारांसाठी, पुनर्वसन गावातीललोकांसाठीठील मागणीनुसार मंडळाने गृहनिर्माण योजना राबवाव्यात. तसेच लोक आवास योजने प्रमाणे ग्रामीण भागातील व्यक्तीगत भूखंडावर मागणी अनुषंगाने"आहे त्याच ठिकाणी" घरे बांधुन देण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाने संमत करुन शिफारसीसह पुढील निर्णयासाठी प्राधिकरणाकडे पाठविण्याबाबत एकमताने निर्णय घेतला.

ठराव क्र. ६८० ६७९

ग्रामीण भागात म्हाडाची अत्यल्प उत्पन्न गटव अल्प उत्पन्न गट योजना राबविण्यासाठी मा. सभापती औरंगाबाद मंडळयांनी शासनाकडे व प्राधिकरणाकडे पाठपुरावा करुन, ही योजना मंजूर करवुन घेतली त्याबाबत मंडळातर्फे मा. सभापती आमदार श्री. कुंडलीकराव नागरे यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते संमत करण्यांत आला.

ठराव क्र. ६८१ ६८०

मंडळाचे मुख्याधिकारी व अधिकारी वर्गाने मराठवाडयातील अस्थायी/ऊसतोड कामगारांसाठी व साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांसाठी जी अतिशय उपयुक्त गृहनिर्माण योजना तयार केली व त्या बाबत साखर कारखान्याकडे जो पाठपुरावा करण्यात येत आहे. त्याबद्दल मंडळातर्फे मुख्याधिकारी श्री. आर. एन. शिनगारे व मंडळातील अधिकारी वर्गाचे अभिनंदन ठराव मंडळाने सर्वानुमते मंजूर केला.

ठराव क्र. ६८२ ६८१

मंडळाचे नवनियुक्त सर्व सदस्यांना ओळखपत्रे, लेटरपॅड व व्हीजिटींग कार्ड मंडळातर्फे देण्यांत यावी व याबाबतची मागणी प्राधिकरणाकडे करण्यांत यावी असा ठराव मंडळाने सर्वानुमते संमत केला.

विषय क्र. ३: औरंगाबाद मंडळाचा सन ९९. २००० चा वार्षिक लेखा.

या विषयाच्या बाब टिप्पणीबाबत मंडळाचे मु. ले. अ. श्री. त्रिंबके यांनी मंडळास माहिती दिली. सन ९९. २००० च्या वार्षिक लेखा प्राधिकरणास त्वरीत पाठवावयाचा असल्याने सदर बाब मंडळाच्या निर्णयास्तव आजच्या बैठकीत सादर केली आहे.

असे मुख्य लेखा अधिकारी यांनी सांगितले. या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र.(६८३) ६८२

औरंगाबाद मंडळाचा सन ९९. २००० चा वार्षिक लेखा मंडळाने मंजूर करून प्राधिकरणास पाठविण्याचा निर्णय एकमताने घेतला.

मा. सभापती यांचे परवानगीने व उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

[आमदार कुंडलीकराव नागरे ]
सभापती औरंगाबाद मंडळ.